दिनांक ०८.०७.२०२६.

## प्रेस नोट

लोकसेवक गणेश बप्पासाहेब गुजर, वय ६१ वर्ष, पद कंत्राटी इंजिनिअर, नेमणुक पंचायत समिती वसमत, ता. वसमत जि. हिंगोली यांनी तक्रारदार यांचेकडे स्वतः ५,०००/— रूपये पंचासमक्ष लाचेची मागणी करून स्विकारण्याचा प्रयत्न केला म्हणुन त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन वसमत शहर येथे गु.रनं ४४४/२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल केले बाबत.

---

दिनांक १०.०६.२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, यातील आरोपी लोकसेवक गणेश बप्पासाहेब गुजर, वय ६१ वर्ष, पद कंत्राटी इंजिनिअर, नेमणुक पंचायत समिती वसमत यांनी तक्रारदार यांचे नावे मंजुर गाय गोठयाचे बांधकामाची एम.बी. (मोजमाप पुस्तीका) लिहुन, पुढे त्यांची सही करून व इतर कारवाई पुर्ण करून दोन हप्त्याचे पैसे मिळवुन देण्यासाठी ५,०००/— रुपये लाचेची मागणी करीत आहे अशी तक्रार कार्यालयास प्राप्त झाली.

दिनांक १०.०६.२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी करण्याकरिता तक्रारदार यांना, पंच क्र. ०१ यांचे सह लोकसेवक यांची भेट घेण्याकरिता पाठविले असता भेटी दरम्यान आरोपी लोकसेवक गणेश गुजर यांनी तक्रारदार यांचे नावे मंजुर गाय गोठयाचे बांधकामाची एम.बी. (मोजमाप पुस्तीका) लिहुन, पुढे त्यांची सही करून व इतर कारवाई पुर्ण करून दोन हप्त्याचे पैसे मिळवुन देण्यासाठी ५,०००/— रू लाचेची केल्याचे लाच मागणी पडताळणी कारवाई मध्ये निष्पन्न झाले.

दिनांक २२.०६.२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान टोकाई देवीच्या टेकडीवर, ता.वसमत जि.हिंगोली येथे आरोपी लोकसेवक व तक्रारदार यांची भेट झाली परंतु लोकसेवक गुजर यांना काहितरी संशय आल्याने त्यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम न स्विकारता निघुन गेले. त्यानंतर तक्रारदार यांनी दि. ०६.०७.२०२६ रोजी जबाब दिला की, ते लोकसेवक गुजर यांना भेटण्यासाठी आजपर्यंत त्यांचा ठावठिकाणा घेवुन शोध घेतला असता ते मला भेटत नाहीत तसेच त्यांना ब—याच वेळा मोबाईलवर संपर्क करण्याचा प्रत्यन केला परंतु ते फोनसुध्दा घेत नाहीत. त्यांना कदाचीत माझेवर संशय आल्याने ते भविष्यात माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारणार नसल्याची खात्री झाल्याने यापुर्वी दिलेली तक्रार व त्यावरून करण्यात आलेली लाच मागणी पडताळणी कारवाई वरून लोकसेवक गणेश गुजर,यांचेवर पुढील कायदेशीर कारवाई करावी असा जबाब दिल्याने आज रोजी सरकारतर्फे फिर्यादी होवुन श्री राजेश मलपिलु पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली यांचे फिर्याद वरून लोकसेवक गणेश बप्पासाहेब गुजर, वय ६१ वर्ष, पद कंत्राटी इंजिनिअर, नेमणुक पंचायत समिती वसमत, यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन वसमत शहर गुरनं ४४४/२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन आरोपी लोकसेवक गणेश गुजर यांना ताब्यात घेण्यात आले असुन अटक करण्याची कार्यवाही सुरू आहे.

सदरची कामगिरी मा. श्री श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधिक्षक, श्रीमती आश्विनी जगताप, अप्पर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, राजेश मलपिलु, पोलीस निरीक्षक, बालाजी तिप्पलवाड, पोलीस निरीक्षक, सपोउपनी युनुस शेख, विजय शुक्ला, पोह/रविंद्र वरणे, राजाराम फुपाटे, भगवान मंडलीक, गजानन पवार, गोविंद शिंदे, अकबर शेख, मपोह योगिता अवचार, पोशि/पुंडगे, अमोल जाधव सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

मा. श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मोबा. क्रमांक ९८२३४१०५०६.
श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली, मोबा. क्रमांक ९८२२२५९९३२
टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६—२२३०५५.
व्हॉटसॲप क्रमांक :— ९३५९१२८८८९/९४२२०६१०६४.

कार्यालय पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली

08/07

विकास घनवट
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली